**मृत ठेवीदाराच्या मुदत ठेवीवर व्याजाचे प्रदान**

डीबीओडी क्र. डीआयआर ৳ बी.सी. ६४/१३.०३.००/२०००-२००१

जानेवारी ०३, २००१
पौष १३, १९२२ (शके)

सर्व व्यावसायिक बँका
(विभागीय ग्रामीण बँका/स्थानिक क्षेत्रीय बँकांसह)

माननीय महोदय

**मृत ठेवीदाराच्या मुदत ठेवीवर व्याजाचे प्रदान**

कृपया मृत ठेवीदाराच्या ठेवीवरील व्याजाच्या प्रदानाबाबतचा आमचा आदेश डीबीओडी क्र. डीआयआर बीसी. ४६/१३.०३.००/२०००-२००१ दिनांकित नोव्हेंबर ४, २००० च्या परिच्छेद १४ आणि आदेश डीबीओडी क्र. डीआयआर ब्बीसी.४८/१३/०३.००/२०००-२००१ दिनांकित नोव्हेंबर ४, २००० च्या परिच्छेद ९ चा संदर्भ घ्यावा. सद्यस्थितीत, मृत ठेवीदाराच्या ठेव खात्यावर दावा करणाऱ्या व्यक्तिला मुदतपूर्तीच्या तारखेपासून प्रत्यक्ष प्रदानाच्या तारखेपर्यंत ज्या कालावधीसाठी ठेव बँकेकडे असेल त्या कालावधीसाठी, ठेवीदाराचा मृत्यू ठेवीच्या मुदतपूर्तीच्या तारखेपूर्वी झाला असेल तरच ठेव बँकेकडे राहिलेल्या कालावधीसाठी लागू असलेल्या व्याज दराने व्याज प्रदान करण्यात येते. मुदत ठेवीच्या मुदतपूर्तीनंतर ठेवीदाराचा मृत्यू झाला असेल तर ती ठेवीदाराची ठेव पुढील कालावधीसाठी नुतनीकरण करण्याच्या हक्क बजावण्यातील असमर्थतता मानून मुदत ठेवीवर मुदतपूर्तीनंतर व्याज देय होत नाही.

२. आम्हाला काही अशी निवेदने मिळाली आहेत कि, ज्या बाबतीत ठेवीची मुदत पूर्ण तिचे नूतनीकरण करण्यात असमर्थ ठरून मुदतापर्तीपूर्वी ठेवीदाराचा मृत्यू झाला असेल, अशा प्रकरणात काही व्याज देण्यास परवानगी द्यावी कारण, बँकेने कायदेशीर वारस/नामनिर्देशित व्यक्तिला रकमेचे प्रदान केल्याच्या तारखेपर्यंत निधीचा वापर केला आहे. आम्ही विषयाचा अभ्यास केला आहे आणि आता असा निर्णय घेण्यात आला आहे कि, अशा प्रकरणात, बँकानी, मुदतपूर्तीच्या तारखेपासून प्रदानाच्या तारखेपर्यंत मुदतपूर्तिच्या तारखेला प्रचलित असलेल्या बचत खात्यावरील दराने (रुपये ठेवींच्या बाबतीत) किंवा रेसिडेंट फॉरिन करंसी (आरएफसी) बचत ठेव दराने (एफसीएनआर(बी) ठेवींच्या बाबतीत) व्याज प्रदान करावे.

३. त्यानुसार दुरुस्त केलेले आदेश डिबीओडी क्र. डीआयआर बीसी.६२ आणि ६३/१३.०३.००/२०००-२००१ दिनांकित जानेवारी ०३, २००१ जोडले आहेत.

४. खालील परिणामस्वरूपी दुरुस्त्या कृपया सूचना पुस्तिका खंड १, भाग १ मध्ये कराव्यात.

(१) विद्यमान परिच्छेद ९.I.११ च्या कलम (i) ला उपकलम (iii) जोडलेल्या स्लिप क्र. १० प्रमाणे दुरुस्त करावे.

(२) विद्यमान परिच्छेद ९.III च्या कलम (ix) ला उपकलम (iii) जोडलेल्या स्लिप क्र. ११ प्रमाणे दुरुस्त करावे.

आपला विश्वासू

**(पी.व्ही.सुब्बा राव)**
**मुख्य महाव्यवस्थापक**